**ठळक बातम्या**

- सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या विलिनीकरणाचा कुठलाही मुद्दा सरकारच्या विचाराधीन नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं स्पष्टीकरण

- आम आदमी पक्षाचे राज्यसभेतले १० पैकी ७ खासदार भाजपात दाखल

- पश्चिम बंगालमध्ये बदल अटळ असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विश्वास

- इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची चर्चेसाठी पाकिस्तानला जाणार

आणि

- थॉमस-उबर कप बॅडमिंटन स्पर्धेत कॅनडावर ४-१ नं मात करत भारताची विजयी सलामी

**<><><><><>**

सार्वजनिक क्षेत्रातल्या इतर बँकांच्या विलिनीकरणाचा कुठलाही मुद्दा सरकारच्या विचाराधीन नाही. यासंदर्भात उच्च स्तरीय बँकिंग समिती अभ्यास करेल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या. आयडीबीआय बँकेतली निर्गुंतवणुकीची प्रक्रीया पुढे सुरू राहणार असल्याचं त्यांनी आज स्पष्ट केलं.

त्यांच्या हस्ते आज भारतीय स्टेट बँकेच्या महाराष्ट्र परिक्षेत्राच्या स्थानिक मुख्यालयाचं पुण्यात उद्घघाटन केलं. जागतिक स्तरावर वाढ करताना स्थानिक गरजांकडे लक्ष दिले, तरच खरी प्रगती होईल, असं यावेळी त्या म्हणाल्या. डिजिटल बँकिंगला महत्त्व देतानाच प्रत्यक्ष मानवी संवादावरही भर देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. राज्यातल्या विणकाम आणि इतर दुर्लक्षित क्षेत्रांना अर्थसहाय्य देण्यावर बँकांनी लक्ष द्यावं, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आम आदमी पक्षाच्या राज्यसभेतल्या १० पैकी ७ खासदारांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. खासदार राघव चड्ढा यांनी आज नवी दिल्लीत झालेल्या वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. आप मूळ विचारांपासून दूर गेला असल्यानं आपण हा निर्णय धेतल्याचं त्यांनी सांगितलं.

**- - -होल्ड - बाइट - - -**

यासंदर्भात राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांना आवश्यक कागदपत्रांसह पत्र दिल्याची माहिती चड्ढा यांनी दिली. स्वाती मालिवाल, अशोक मित्तल, संदीप पाठक, हरभजन सिंग, राजेंद्र गुप्ता, विक्रम साहनी हे खासदार भाजपामध्ये गेल्याचं चड्ढा म्हणाले. भ्रष्टाचाराच्या विरोधात सुरू झालेला हा पक्ष आता भ्रष्ट व्यक्तींच्या ताब्यात गेल्याचा आरोप चड्ढा यांनी केला.

तर भाजपानं पुन्हा एकदा पंजाबमधल्या नागरिकांशी दगाबाजी केल्याचा आरोप आपचे समन्वयक अरविंद केजरीवाल यांनी केला आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये बदल अटळ असल्याचं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात बारुईपूर इथं एका प्रचारसभेला ते संबोधित करत होते. पहिल्या टप्प्यातल्या मतदानाचा कल अनेक जिल्ह्यांमध्ये तृणमूलला धक्का देणारा आहे. दुसऱ्या टप्प्यात हा कल अधिक मजबूत व्हावा आणि विकसित बंगाल घडवता यावा यासाठी मतदारांनी पुढाकार घ्यावा असं आवाहन मोदी यांनी यावेळी केलं.

पश्चिम बंगालमधे पुढचं सरकार भाजपाचं असेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही व्यक्त केला आहे. उत्तर २४ परगणा जिल्ह्यात हिंगलगंज इथे एका सभेत शहा बोलत होते. भाजपा पहिल्या टप्प्यातल्या १५२ जागांपैकी ११० जागा जिंकण्याच्या तयारीत असल्याचं शहा म्हणाले.

पश्चिम बंगालला देय असलेले दोन लाख कोटी रुपये केंद्र सरकारनं रोखून ठेवल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला आहे. हावडा इथल्या एका प्रचारसभेला त्या संबोधित करत होत्या. आपल्या नेतृत्वाखाली राज्य सुरक्षित हातात आहे, भाजपानं आपलं लक्ष मणिपूर आणि नोएडाकडे केंद्रित करावं असं बॅनर्जी म्हणाल्या.

**<><><><><>**

देशातली गावं, शेतकरी, पंचायती आणि व्यापक ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाशिवाय विकसित भारताची संकल्पना साकार होऊ शकत नाही, असं केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल म्हणाले. ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय पंचायती राज

दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. राष्ट्रीय प्रगतीसाठी तळागाळापासून सर्वसमावेशक विकास आवश्यक असल्याचं ते म्हणाले.

या सोहळ्यात विविध राज्यांतील पंचायतींचे लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त देशभरातील लोकप्रतिनिधींचं अभिनंदन केलं आहे. "जनसेवेसोबतच राष्ट्रसेवेसाठी असलेले समर्पण सर्वांना प्रेरणा देणारे आहे," अशा शब्दांत त्यांनी लोकप्रतिनिधींच्या कार्याचा गौरव केला.

<><><><><>

बिहार विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यात मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांना यश मिळालं आहे. विधानसभेच्या विशेष अधिवेशनात आज त्यांनी मांडलेला विश्वासदर्शक प्रस्ताव बहुमतानं मंजूर झाला. २४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २०२ सदस्यांचा पाठिंबा आहे.

<><><><><>

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची चर्चेसाठी पाकिस्तानला जाणार असल्याची माहिती इर्ना या इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनं दिली आहे. याशिवाय ते ओमान आणि रशियालाही भेट देतील. इराण-अमेरिकेत शस्त्रसंधीसंबंधीच्या वाटाघाटींची दुसरी फेरी व्हावी यासाठी पाकिस्तानचे अधिकारी प्रयत्न करत असतानाच हा दौरा होत आहे. या दौऱ्यात सध्याच्या प्रादेशिक घडामोडींवर द्विपक्षीय सल्लामसलत आणि चर्चा तसंच अमेरिका आणि इस्रायलनं इराणबरोबर सुरू केलेल्या युद्धाच्या सद्यस्थितीवर चर्चा होणार असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

युद्धबंदी सुरु असूनही इस्रायलनं आज दक्षिण लेबनानमधल्या हिजबुल्ला अतिरेक्यांच्या तळांवर हवाई हल्ले केले. या तळांवरून इस्रायलवर हल्ला करण्याचा अतिरेक्यांचा बेत होता, असं स्पष्टीकरण याबाबत इस्रायलच्या हवाई दलानं दिलं आहे. इस्रायल आणि लेबनाननं  युद्धबंदीचा कालावधी आणखी तीन आठवडे वाढवायला सहमती दर्शवली असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतंच जाहीर केलं आहे.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेने पेटीएम पेमेंट बँकेचा परवाना आजपासून रद्द केला आहे. खातेदाराच्या हिताला बाधा पोहोचेल अशा पद्धतीने बँकेचा कारभार सुरू असल्याने हा निर्णय घेतल्याचं रिझर्व्ह बँकेने म्हटलं आहे. सध्या ग्राहकांच्या ठेवी परत देण्यासाठी बँकेकडे पुरेसा निधी असल्याचं रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरूमध्ये एम. चिन्नास्वामी मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरु आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सच्या ९ षटकात बिनबाद ९४ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

डेन्मार्कमध्ये हॉर्सेन्स इथे सुरू झालेल्या थॉमस आणि उबर कप बॅडमिंटन स्पर्धेत भारताने कॅनडावर ४-१ असा दणदणीत विजय मिळवला. सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने जोनाथन लाई आणि केविन ली यांच्यावर २१-१०, २१-११ असा सरळ गेममध्ये विजय मिळवला. त्यानंतर आयुष शेट्टीने ब्रायन यांगला २१-१३, २१-१७ असे हरवून भारताला आघाडी मिळवून दिली. हरिहरन आमसाकरुणन आणि एम. आर. अर्जुन या जोडीने टाय अलेक्झांडर लिंडेमन आणि नायल याकुरा यांच्यावर २१-७, २१-१५ असा विजय मिळवून सामना जिंकला. किदाम्बी श्रीकांतने जोशुआ गुयेनला २१-१७, २१-१२ अशा सरळ गेममध्ये नमवलं.

<><><><><>

इजिप्तमध्ये कैरो इथे सुरू असलेल्या आय एस एस एफ कनिष्ठ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी आज सुवर्ण पदक जिंकून आपलं वर्चस्व कायम राखलं. १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात शांभवी क्षीरसागर आणि दिव्यांशू देवांगन यांनी सुवर्णपदक पटकावलं आहे. या विजयाबरोबर भारताची पदकसंख्या १२ झाली आहे. चार सुवर्ण, पाच रौप्य आणि तीन कास्यपदकांसह भारत पदकतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

//<><><><><>//